**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org
roaurangabad.dte@gmail.com

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१२/ ६८८
दिनांक :- 10 FEB 2013

प्रति,
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतने,
औरंगाबाद/जालना/जिंतुर/नांदेड/बीड
उस्मानाबाद/अंबड/लातूर/शा.नि.म.तं.नि.लातूर

विषय :- केंद्रशासनाच्या विशेष योजनेतंर्गत शासकीय तंत्रनिकेनामध्ये मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतींच्या बांधकामाचे उपयोगिता प्रमाणपत्र व भौतिक अहवाल सादर करणेबाबत.
संदर्भ :- ९(१)/बांधकाम/मुलींचे वसतिगृह/२०१३-१४/५५ दिनांक २१/०१/२०१३

या कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद/जालना/जिंतूर/नांदेड/बीड /उस्मानाबाद/अंबड/लातूर/शा.नि.म.तं.नि.लातूर यासस्थांना मुलींच्या वसतिगृह बांधकामासाठी १.०० कोटी रुपये केंद्र शासन अनुदान देत असून त्यापैकी काही रक्कम संबंधीत तंत्रनिकेतनांच्या या योजनेसाठी बँकेत उघडण्यात आलेल्या खात्यामध्ये जमा झालेले आहेत या योजनेत अंतभूर्त प्रत्येक शासकीय तंत्रनिकेतनांसाठी ५० विद्यार्थिनींचे वसतिगृह अपेक्षित असून या वसतिगृह बांधकामासाठी येणा-या खर्चापैकी १.०० कोटी रुपये या योजनेमार्फत केंद्र शासनाकडून मिळणार असून उर्वरित रक्कमेची राज्य सरकार तरतूद करणार आहे त्यानुसार प्रशासकीय मान्यता मिळालेल्या संस्थांकरिता उर्वरित निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे संस्थांनी पुढील प्रक्रीय तातडीने सुरू करणे आवश्यक आहे. तसेच अद्यापही काही संस्थांचे नकाशे व अंदाजपत्रके संचालनालयास अप्राप्त आहेत. याबाबत आपणास वारंवार सूचित केलेले असतांना देखील बराच विलंब लागत आहे. ही गंभीर बाब असून केंद्र शासनाने या बाबत नाराजी व्यक्त केलेली आहे. संचालनालयाचे लेखा परिक्षण सुरू असतांना याबाबत अधिका-यांनी मुलींच्या वसतिगृहाच्या विलंबाबाबत व ढिसाळ कार्यवध्दतीबाबत खुलासा वजा स्पष्टीकरण सादर करावयास सांगण्यात आलेले आहे. या बाबत संचालनालयाने दिरंगाई करणा-या संबंधित संस्थांची योग्य ती दखल तथा कार्यवाही करण्याचे निश्चित केलेले आहे.

सन २००९-१० पासून या योनजेतील तंत्रनिकेतनांना केंद्र शासनाकडून निधीचे वितरण केले असून त्याप्रमाणे प्रत्येक आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) a भौतिक उपलब्धता अहवाल (Physical Achievement Report) आर्थिक वर्ष संपताच दोन प्रतीमध्ये संबधीत तंत्रनिकेतनांचे प्राचार्यांनी संचालनालयास दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे. व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

तसेच संचालनालयाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, संबधित तंत्रनिकेतनांचे प्राचार्य, यांनी २००९-१०, २०१०-११ **a** २०११-१२ या आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र **a** भौतिक उपलब्धता अहवाल तसेच काही संस्थांनी वसतिगृहाचा प्रस्ताव योजना कालमर्यादित असून अद्याप पर्यंत सादर केलेला नाही. संबधित संस्थेच्या प्राचार्यांना सुचित येते की करण्यात येते की त्यांनी प्रत्येक आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र व भौतिक उपलब्धता अहवाल, नकाशे त्वरीत दिनांक १५/०२/२०१३ पर्यत संचालनालयास सादर करावे.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

प्रत :- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना प्रत देऊन सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर मुलींचे वसतीगृह या शिर्षाखाली प्रसिध्द करण्यात यावे.